क्र.कक्ष-1/पुरवठा/कलि/कावि/ 225 /2016
जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालय,
दिनांक 17 जुन, 2016

# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती

## जाहिरात सूचना (सातवी वेळ )

ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ मध्ये ग्राहकांच्या अधिकारांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद स्थापन करण्यासाठी खालील प्रमाणे अशासकीय सदस्यांची संख्या व प्रवर्ग निश्चीत करण्यात येत असुन शासन निर्णय क्रमांक शासन पत्र क्र. ग्रारापा1013/प्र.क्र.119/ग्रासं-2 दिनांक 19.10.2013 मध्ये पात्रतेचे निकष देण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov. in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असुन त्याचा सांकेतांक 201310191602526306 असा आहे.

गोंदिया जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर प्रवर्गनीहाय अशासकीय सदस्यांची नियुक्ती करावयाची असल्याने गोंदिया जिल्हयातील इच्छुक संस्थांचे प्रतिनिधी व व्यक्ती यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहे. या अगोदर ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केले आहेत त्यांनी पुन्हा अर्ज करू नये, या व्यतिरिक्त आपण ज्या प्रवर्गासबंधाने अर्ज सादर केला आहे त्यांचेसी सबंधित कागदपत्राची पुर्तता करावयाची असल्यास ते विहीत मुदतीत सादर करता येईल . प्रवर्गनिहाय अशासकीय सदस्यांची नियुक्तीचे अर्ज **दिनांक 30 जुन , 2016** पर्यंत जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया यांचे कार्यालयात ( कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन ) शासनाने विहीत केलेल्या परिशिष्ट अ व ब प्रमाणे परिपूर्णपणे भरून साक्षांकित प्रतीसह सादर करांवे. साक्षांकन हे केंद्र/राज्य शासनाच्या राजपत्रित अधिकारी यांचे असावे. **साक्षांकीत प्रति जोडल्या नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.**

| अ.क्र. | प्रवर्ग | नियुक्त करावयाच्या अशासकीय सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | जिल्हा परिषदेचे सदस्य , | २ पद (१ महिला राखीव ) |
| २. | पंचायत समितीचे सदस्य, | २ पद (१ महिला राखीव) |
| ३. | ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी , | १ पद ( सर्वसाधारण ) |
| ४. | वैद्यक व्यवसायाचे प्रतिनिधी | २ पद (१ महिला राखीव) |

सर्व माहिती, अर्जाचा नमुना, शासन निर्णय, जाहिरात जिल्हाधिकारी गोंदिया यांचे संकेत स्थळ gondia.Nic. in वर , उपलब्ध आहे. **दिनांक 30 जुन , 2016** नंतर प्राप्त होणारे व अपूर्ण अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

जिल्हाधिकारी ,
गोंदिया